**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

**उन्हाळी - २०१९ सत्रपद्धती अभ्यासक्रमाच्या परीक्षा आवेदनपत्रे स्वीकारण्याच्या तारखांमध्ये वाढ**
**विद्यार्थी व महाविद्यालयांनी नोंद घेण्याचे विद्यापीठाचे आवाहन**

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाद्वारे सर्व संबंधितांना सूचित करण्यात येते की, उन्हाळी - २०१९ सत्रपद्धती अभ्यासक्रमाच्या परीक्षा आवेदनपत्रे स्वीकारण्याच्या तारखांमध्ये वाढ करण्याचा विद्यापीठाने निर्णय घेतला आहे. सत्रपद्धती अभ्यासक्रमाच्या परीक्षांसाठी महाविद्यालयाने विद्यार्थ्यांकडून परीक्षा आवेदनपत्रे आवश्यक शुल्कासह सादर करण्याची तारीख १५ जानेवारी, २०१९ असून सदर आवेदनपत्रे महाविद्यालयाला विद्यापीठात २५ जानेवारी, २०१९ पर्यंत सादर करावयाची आहेत.

जे विद्यार्थी वरील तारखेपर्यंत आवेदनपत्रे सादर करु शकले नाहीत, अशा विद्यार्थ्यांना महाविद्यालयात २८ जानेवारी पर्यंत आवश्यक शुल्क व विहित केलेल्या विलंब शुल्कासह परीक्षा आवेदनपत्रे सादर करता येतील. प्राप्त झालेली सदर आवेदनपत्रे अमरावती व अकोला जिल्ह्यातील महाविद्यालयांना ५ फेब्रुवारी, २०१९ पर्यंत, तर बुलढाणा, यवतमाळ व वाशिम जिल्ह्यातील महाविद्यालयांना ६ फेब्रुवारी, २०१९ पर्यंत विद्यापीठात सादर करावयाची आहेत.

याबाबत विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य व पदव्युत्तर शैक्षणिक विभागांचे विभागप्रमुख यांना पत्र पाठवून परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. हेमंत देशमुख यांनी कळविले आहे. तरी सर्व संबंधितांनी याची नोंद घ्यावी, असे विद्यापीठाच्यावतीने कळविण्यात येत आहे.

---

प्रति,
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी
दै.............................. अमरावती.

**जनसंपर्क विभाग**
दि. १०/०१/२०१९.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी